Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्राचे संजीवक

— ४ —

'माला'कार चिपळूणकर

— डॉ. न. शिंदवरे



केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आतां भारत स्वतंत्र झाला आहे. आपला महाराष्ट्रही पुनरपि स्वातंत्र्य भोगीत आहे. सतराव्या शतकांत छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्राला जें स्वातंत्र्याचें सिंहासन मिळवून दिलें, तें इंग्रजी सत्तेनें ढासळून टाकलें. आपल्या मायभूमीला तिच्या हक्काचें तें सिंहासन परत मिळवून देण्यासाठीं जे कोणीं झटले व झगडले अशीं नररत्नें अनेक आहेत हें आपलें भाग्य होय.

स्वतंत्र वृत्ति व त्यागबुद्धि हे महाराष्ट्राचे विशेष गुण – त्याच्या सह्याद्रि-विंध्याद्रींइतकेच उत्तुंग व अभेद्य. ह्या गुणांची गरज स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं जितकी होती, तितकीच ह्यापुढेंही लागणार आहे. केवळ राजकीय पारतंत्र्य गेलें म्हणजे सर्वांगीण स्वातंत्र्य आलें असें थोडेंच आहे? आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, इत्यादि सर्व क्षेत्रांत आपल्याला स्वतंत्र व्हावयाचें आहे, नवा महाराष्ट्र, नवा भारत उभारावयाचा आहे. त्यासाठीं पुढील पिढ्यांपुढें नवीं ध्येयें, नवीं मूल्यें, नवीं श्रद्धास्थानें ठेवलीं पाहिजेत. अनास्था, आळस व भोगलोलुपता ह्यांच्या चिखलांत तरुण महाराष्ट्रीयानें रुतून बसतां कामा नये. ध्येयनिष्ठा, सेवावृत्ति व त्यागबुद्धि ह्या गुणांचें रक्त नवीन पिढीच्या नसांतून खेळेल, तरच आपला महाराष्ट्र, आपला भारत सर्वांगीण स्वतंत्रता उपभोगूं शकेल.

ह्या गुणांचें बीजारोपण कसें होणार? एक मार्ग म्हणजे त्या गुणांचे पुतळे असलेल्या पुरुषश्रेष्ठांचीं चरित्रें समजावून सांगणें. महाराष्ट्राला आंग्लशाहींतून मुक्त करण्यासाठीं ज्यांनीं ज्यांनीं लोकोत्तर गुण प्रगट केले, अशांचीं बारा चरित्रें, त्या त्या गुणांवर भर देऊन, लिहिण्याचें मीं योजिलें आहे. राजकीय दृष्टीनें मृतवत् झालेल्या महाराष्ट्राला संजीवन देणाऱ्या विभूतींचीं हीं चरित्रें त्याला नैतिक, सामाजिक, आर्थिक, इत्यादि क्षेत्रांतही नवजीवन देण्यास समर्थ ठरतील असा मला विश्वास वाटतो. महाराष्ट्राच्या कुशींतून असे थोर पुरुष "झाले, आहेत, पुढें होणार" हा श्रीसमर्थांचा आशीर्वाद म्हणजे संजीवनीमंत्रच आहे, नाहीं का?

दा. न. शिखरे

'महात्मा' कार्यालय, नातूबाग,
पुणें २, ता. १९ मे, १९५१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CHECKED

महाराष्ट्राचे
संजीवक
....४....

मालाकार चिपळूणकर

लेखक
दा. न. शिखरे, एम्. ए.

Initial
प्रवेश क्रमांक.....
पुस्तक संख्या.....
पुस्तक पर सदैव प्रकार की निशानियां लगाना या पृष्ठों को मोड़ना मना है। पुस्तक को पानी से बचाएं। पुस्तक को पानी में न डालें। पुस्तक को पानी में न रखें। पुस्तक को पानी में न डालें।

केशव प्रिंकाजी ढवले
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

****

मूल्य आठ आणे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रम

बाप-लेकांची जोडी	...	३
सरस्वतीची आराधना	...	७
स्वाभिमानाचे स्फुल्लिंग	...	१३
मालेची मोहिनी ...	...	१७
"मराठीचा शिवाजी"	...	२३
संस्थांचें यश ...	...	२८
दुसरा ज्ञानेश्वर ...	...	३६

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

पहिली आवृत्ति : १९५३

मुद्रक : वा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक : के. भि. ढवळे
कर्नाटक हाउस
चिराबाजार, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



बाप-लेकांचीं जोडी

जसा बाप तसा लेक, अशी जोडी क्वचितच आढळते. अशा वेळीं, समुद्रापासून चंद्राची उत्पत्ति झाल्याचा दाखला दिला जातो, आणि "शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं" असें कारणही सांगितलें जातें. पण इतिहासानें ह्याच्या उलट नमुने कितीतरी दाखविले आहेत ! शिवाजीच्या पोटीं संभाजी आणि गांधीजींच्या पोटीं हिरालाल अशींच उदाहरणें फार. विद्वान, देशभक्त व लोकसेवक अशा पित्याला तशाच पुत्राचा लाभ झाल्याचीं उदाहरणें साऱ्या जगाच्या इतिहासांत थोडींच सापडतील ; मग अशा गुणांच्या बाबतींत पित्याच्या पुढें पाऊल टाकणारे आणि आपल्या कर्तृत्वानें पित्याचा पराभव करणारे 'सवाई बेटे' विरळाच.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्रानें अशी जोडी सतराव्या शतकांत निर्माण केली आणि तशीच एकोणिसाव्या शतकांतही.

सतराव्या शतकांत शहाजीराजांनीं विजापूरच्या आदिलशाहीची सेवा इमानानें पण स्वाभिमानानें करून आपल्या धर्माची सेवा होईल तितकी केली. पण हे पारतंत्र्याचे पाश तोडून शिवाजी-महाराजांनीं स्वतंत्र राज्यच स्थापण्याचा विशेष पराक्रम केला. एकोणिसाव्या शतकांतही परक्या इंग्रजांची ताबेदारी पत्करून मराठी साहित्याची सेवा कृष्णशास्त्री चिपळूणकर ह्यांनीं भाषांतर-रूपानें शक्य तितकी केली. पण त्यांचे चिरंजीव विष्णुशास्त्री ह्यांनीं स्वतंत्र, तेजस्वी व चैतन्यदायक असें वाङ्मय निर्माण करून, मराठी गद्याला मयूरासनच मिळवून दिलें. " मी मराठीचा शिवाजी आहें " असे आत्मविश्वासाचे उद्गार त्यांनीं काढले. ते यथार्थ असल्याची ग्वाही सर्व साहित्यिकांनीं दिलेली आहे.

कृष्णशास्त्री ह्यांची बुद्धि इतकी तरतरीत होती कीं त्यांचे गुरुजी त्यांना ' बृहस्पति ' म्हणत. त्या काळाला धरून त्यांनीं वेदांचें व शास्त्रांचें अध्ययन केलें होतें. पण नव्या काळाची दिशा ओळखण्याइतके ते समयज्ञ होते. वयाच्या पंचविसाव्या वर्षी, म्हणजे १८४९ सालीं इंग्रजी शिकण्यास त्यांनीं प्रारंभ केला. कारण त्यांच्यावर प्रेम करणारे एक गुरुजी त्यांना म्हणाले, " अरे, ह्याउपर खांद्यावर शालजोडी टाकून हिंडण्यांत प्रतिष्ठा राहाणार नाहीं. तूं शाहाणा असलास तर इंग्रजी शीक. " नुसता उपदेश करूनच ते गुरुजी थांबले नाहींत, तर त्यांनीं स्वतः उतारवयांतही, इंग्रजी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विद्येचा अभ्यास सुरू केला. कृष्णशास्त्री तर इंग्रजी इतके शिकले कीं पूना कॉलेजमध्यें ते मराठीचे असिस्टंट प्रोफेसर झाले. त्यांनीं रासेलस ह्या इंग्रजी व मेघदूत ह्या संस्कृत - अशा दोन ग्रंथांचीं सहज व सरस भाषांतरें केलीं. ख्रिस्ती मिशनऱ्यांना विरोध करण्यासाठीं 'विचार-लहरी' नांवाचें पत्र काढणारांपैकीं ते एक होते.

विद्या, धन, लौकिक व जनसेवा ह्या चारी दृष्टींनीं श्रेष्ठ असलेले कृष्णशास्त्री ह्यांना दोन मुलें झालीं. एक विष्णुशास्त्री व दुसरे लक्ष्मणराव. विष्णुशास्त्री ह्यांचा जन्म ता. २० मे १८५० रोजीं पुणें येथें झाला. सहासात वर्षांचे होईपर्यंत ते घरींच शिकत होते. नंतर शाळेंत जाऊं लागले. १८६१ सालीं ते पूना हायस्कूलमध्यें इंग्रजी शिकण्यास गेले. एकदा त्यांच्या एका मास्तरांनीं बक्षिसाची योजना जाहीर केली. ती म्हणजे गोल्डस्मिथ्चें 'उध्वस्त गांव' (डेझर्टेड व्हिलेज) हें सर्व काव्य जो विद्यार्थी बिनचूक म्हणून दाखवील, त्यास एक हातरुमाल बक्षीस मिळेल. विष्णुशास्त्र्यांनीं हें बक्षीस पटकाविलें. आणखीही तीन विद्यार्थ्यांना हातरुमाल मिळाले. बुद्धीची तरतरी व स्मृतीची तत्परता हे गुण ह्या विद्यार्थीदशेंतही विष्णुशास्त्री ह्यांच्या ठिकाणीं आढळून येत होते. मात्र त्यांचा स्वभाव मिडस्त व एकलकोंडा होता. ते फारसे बोलत नसत, पुढें पुढें करीत नसत. पण एखादेंच वाक्य असें बोलत कीं त्यांत त्यांची मार्मिकता व रसिकता प्रकट व्हावी. आपला अभ्यास बरा कीं आपण बरे, असें त्यांचें वागणें असे. त्यांच्या अभ्यासांत नियमितपणा असे. बडेजाव, धांदल किंवा गोंधळ त्यांच्या स्वभावांतच नसे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

बा प ले का ची गो डी Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

घरींसुद्धा विष्णुशास्त्री खाण्यापिण्यासाठीं, पोषाखासाठीं किंवा इतर कोणत्याही कारणासाठीं कधीं तक्रार म्हणून करावयाचे नाहींत. त्या वेळचे इंग्रजी शिकणारे विद्यार्थी म्हणजे किती ऐटीनें व रुबाबानें राहात. त्यांत विष्णुशास्त्री तर श्रीमंत व विद्वान बापाचे बेटे. पण त्यांची राहाणी अगदीं साधी ! हायस्कुलांत असतांना एकदा तर त्यांचा अंगरखा फाटलेला होता. तो पाहून त्यांची चेष्टा करण्यासाठीं त्यांचे एक शिक्षक वर्गातील इतर मुलांकडे बघून म्हणाले, "पाहा रे, ह्या विष्णूला धडका अंगरखा कांहीं मिळत नाहीं. ह्याच्या बापाला पैसे मिळत नाहींतसें वाटतें." विष्णुशास्त्र्यांचें ब्रीद म्हणजे 'साधी राहाणी व उच्च विचार-सरणी.'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



सरस्वतीची आराधना

हायस्कुलांत इंग्रजीचा अभ्यास चालू असतांना विष्णुशास्त्र्यांनीं संस्कृतकडेही विशेष लक्ष पुरविलें होतें. १८६५ सालीं ते मॅट्रिकच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले. त्याच वर्षीं त्यांचें लग्नही मोठ्या थाटानें झालें. पुढील वर्षीं ते पूना कॉलेजांत शिकावयास गेले. त्या वेळीं तें कॉलेज विश्रामबाग वाड्यांतून निघून वानवडीस गेलें होतें. तेथें विष्णुशास्त्री शिकूं लागले. पुढें दोन वर्षांनीं तें कॉलेज येरवड्याजवळ स्वतःच्या इमारतींत गेलें आणि 'डेक्कन कॉलेज' म्हणून मोठी ख्याति पावलें. हें कॉलेज शहरापासून दूर, उंच माळावर आहे. डोंगर-माथ्याचा मोकळा वारा तेथें भरारा वाहातो आणि नदीकांठचा गारवा त्या वाऱ्यांत मिसळून जातो. खडकी-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
****

पर्यंतचा मुलुख दिसावा इतकी उंच जागा ह्या कॉलेजची आहे. एकीकडे बंडगार्डनचा रमणीय बगीचा दृष्टीस पडे, तर दुसरीकडे टेकड्यांवरून झुळझुळ वाहाणाऱ्या झऱ्यांचें नैसर्गिक नर्तन दिसे.

अशा त्या रमणीय विद्यामंदिरांत कोणाला प्रवेश मिळत असे? सरदार–इनामदार, रावसाहेब–रावबहादुर अशा खानदानी श्रीमंतांच्या मुलांनाच. आणि अशांची संख्या किती? तर फक्त साठसत्तरच ! हे बाजीरावाचे बेटे तेथें काय करीत? तर चमचमीत पक्वान्नें झोडणें, झकपक पोषाख करणें, उंची अत्तराचा घमघमाट पसरविणें, फुलांच्या शेजेवर पहुडणें, गप्पा छाटणें, चांदण्या रात्रीं फिरणें, आणि एकंदरींत मौज मारणें, ह्यांतच त्यांचा बहुतेक वेळ खलास होई. त्या खुशालचेंडूंच्या ह्या गुलाबी जीवनाला अपवाद म्हणजे विष्णुशास्त्र्यांसारख्या विद्याप्रेमी विद्यार्थ्यांचा. प्रिं. वर्ड्स्वर्थ, प्रो. केरोपंत छत्रे, डॉ. कीलहॉर्न वगैरे थोरथोर विद्वान तेथें प्राध्यापक होते. त्यांच्या विद्वत्तेचा लाभ सच्चे विद्यार्थी घेत. विष्णुशास्त्री तर कॉलेजबाहेरील ग्रंथांचेंही वाचन खूप करीत. त्यांचे वडील कृष्णशास्त्री हे 'दक्षिणा प्राईज कमिटीचे' अधिकारी असल्यामुळें त्यांच्या घरीं नवेनवे मराठी ग्रंथ तपासण्यासाठीं येत. त्यांचा आस्वाद घेण्यास विष्णुशास्त्री चुकत नसत. शिवाय मेकॉलेचे निबंध, स्कॉट्च्या कादंबऱ्या, ॲडिसन्चे टीकालेख, इत्यादि इंग्रजी वाङ्मयांतही त्यांनीं मनसोक्त मज्जन केलें.

संस्कृत भांडारांतील काव्य-नाटकांचीं हिरेमाणकें तर त्यांनीं पुनः पुन्हा पाहिलीं व पारखलीं. त्यांना वाचनाचा छंद जबर. इंग्रजी, संस्कृत व इतिहास ह्या विषयांत त्यांची गति चांगली. ज्यूनिअर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्कॉलरशिप व मराठी स्कॉलरशिप अशा दोन शिष्यवृत्त्या त्यांना मिळत होत्या. पण त्यांच्या बुद्धीनें गणिताकडे पाठ फिरविलेली. त्यामुळें १८६७ सालच्या अखेरीस ते लिटिलगोच्या परीक्षेंत अपयश पावले. पुढें बी. ए.च्या परीक्षेंतही १८७० सालीं ते अनुत्तीर्ण झाले. तथापि त्यांना इंग्रजी, संस्कृत व मराठी ह्या तीनही भाषाविषयांतील प्रावीण्यामुळें शिष्यवृत्त्या मिळतच होत्या.

कॉलेजांत विद्यार्थ्यांच्या दर आठवड्यास वक्तृत्व-सभा होत. पण विष्णुशास्त्री पडले अबोल. डोक्यांत ज्ञान भरगच्च भरलेलें असलें, तरी त्याचें प्रदर्शन नाहीं. फक्त दोनतीनदांच त्यांनीं तेथें आपले निबंध वाचले होते. त्यांत 'प्राचीन हिंदु लोकांचें ज्ञान' ह्या विषयावर एक होता. त्यांत त्यांनीं वेदकाळींही हिंदु लोकांचें ज्ञान किती पुढारलेलें होतें तें दाखविलें. संस्कृतची आवड त्यांना इतकी असे कीं कॉलेजांतील अभ्यासाखेरीज इतर संस्कृत ग्रंथ ते पुष्कळ वाचीत. एवढेंच नव्हे, तर दर शनिवारीं कॉलेजांतून ते घरीं गेले म्हणजे दुसऱ्या दिवशीं सकाळीं मराठी क्रमिक पुस्तकांतून पांच ओळींचें भाषांतर संस्कृतमध्यें करावयाचें, असा त्यांचा नित्यक्रम असे. तो त्यांनीं सतत तीन वर्षें न चुकतां चालविला. तीन वर्षांचीं तीन पुस्तकें तयार झालीं.

कॉलेजांतील विद्यार्थ्यांपैकीं बरेचसे चैन करण्यांत व कांहींजण अभ्यास करण्यांत गर्क असत. पण सर्व विद्यार्थ्यांनीं एकत्र येऊन आनंद लुटावा असेही कांहीं प्रसंग घडत. वार्षिक संमेलन हा तसा एक प्रसंग. त्यांत विष्णुशास्त्री नियमानें भाग घेत. तसाच दुसरा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसंग म्हणजे विद्यार्थ्यांचे नाट्यप्रयोग. एकदा वेणीसंहार नाटक झालें. त्यांत धर्मराजाची भूमिका विष्णुशास्त्री ह्यांजकडे आली. विशेष हें कीं समोर प्रेक्षकवृंदांत आपले वडील कृष्णशास्त्री बसलेले असतांना विष्णुशास्त्र्यांना पितृ-तर्पण-विधि करावा लागला. तें पाहून त्यांच्या स्नेहीमंडळींत खूप हशा पिकला. पुढें एकदा मृच्छकटिक नाटकाचा प्रयोग विद्यार्थ्यांनीं केला. त्यांत विष्णुशास्त्री ह्यांच्याकडे न्यायाधीशाची भूमिका आली होती.

बी. ए.च्या उंबरठ्यावरच विष्णुशास्त्र्यांना ठेच लागली. ते नापास झाले. त्यामुळें १८७१ सालच्या जानेवारीपासून त्यांनीं बाबा गोखले ह्यांच्या खाजगी शाळेंत शिक्षकाची नोकरी धरली. सकाळीं शाळेंत शिकवावें आणि दुपारीं बी. ए.चा अभ्यास करावा, अशी शिक्षक-विद्यार्थ्याची संमिश्र भूमिका विष्णुशास्त्री पार पाडीत होते. बाबांची शाळा म्हणजे अव्यवस्थेचा बाजार होता. सरकारी हायस्कुलांची फी सरसकट सर्व विद्यार्थ्यांना दोन रुपये असे. पण बाबांच्या शाळेंत एक रुपयाच होती. म्हणून तीन-साडेतीनशें मुलें तेथें शिकावयास जात. विष्णुशास्त्री मॅट्रिकच्या वर्गाला संस्कृत व इतिहास हे विषय शिकवीत. त्या विषयांत त्यांचा हातखंडा असल्यानें व त्यांना शिकविण्याची हौसही मोठी असल्यानें त्यांचें शिकविणें आकर्षक व परिणामकारक होई. पण शाळेच्या वातावरणांतील अव्यवस्थेचे जंतु त्यांच्या शरीरांत शिरले होते. ते वर्गावर सहसा वेळेवर जात नसत. कांहीं वाचीत बसले असले आणि तासाची घंटा झाली तरी ते उठावयाचे नाहींत. पंधरा-वीस मिनिटें तसेच वाचीत बसत, मग वर्गावर जात. तेथेंही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिस्त ठेवण्याइतका कडकपणा त्यांच्या अंगीं नसे. आपल्या डोक्यांतील अगाध ज्ञानाचे झरे विद्यार्थ्यांपुढें वाहाते करावयाचे, एवढेंच त्यांना ठाऊक.

पुढें बी. ए. झाल्यावर १८७३ सालीं विष्णुशास्त्री सरकारी हायस्कुलांत गेले. गेले म्हणजे काय ? विद्याखात्याच्या डायरेक्टरांनींच हायस्कूलचे हेडमास्तर श्री. महादेवराव कुंटे ह्यांजकडून त्यांना निमंत्रण पाठविलें. त्या वेळीं नोकऱ्या फार होत्या आणि नोकर थोडे होते. त्यांतही विद्वान बापाचा हुशार मुलगा, बी. ए. झालेला, म्हणजे केवढा मान ! नोकरी त्याच्या पायांशीं लोटांगण घालीत यावयाची.

ही नोकरी लागण्यापूर्वी, इंग्रजी व मराठी लेख लिहून विष्णुशास्त्र्यांनीं आपल्या लेखनकलेचीं किरणें फेकण्यास सुरुवात केली होती. जॉनसनच्या रासेलस पुस्तकाचें भाषांतर कृष्णशास्त्री 'शालापत्रक' मासिकांतून देत असत. त्याच्या शेवटच्या भागाचें भाषांतर करण्याचें काम त्यांनीं आपल्या बुद्धिमान चिरंजिवांवर सोपविलें. त्यांनींही ती सांधे-जोड बेमालूम केली. संस्कृत वाङ्मयांत 'कादंबरी' हा ग्रंथ जसा पितापुत्रांनीं मिळून रचला, तसाच हा अलौकिक प्रकार. त्याचप्रमाणें कालिदास, भवभूति, बाण, सुबंधु व दण्डी ह्या पांच संस्कृत कवींच्या काव्यावर टीकात्मक असे लेख विष्णुशास्त्री ह्यांनीं 'शालापत्रकांत' लिहिले. त्यांतील भाषेचा डौल, वृत्तीची रसिकता आणि टीकेंतील मार्मिकपणा ह्या गुणांमुळें ती लेखमाला विद्वानांना फारच आवडली आणि 'सवाई शास्त्रीबुवा'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उदयास आले असें त्यांना वाटूं लागलें. १८७५ सालीं तर 'शालापत्रक' मासिकाची धुराच विष्णुशास्त्र्यांनीं आपल्या शिरावर घेतली. त्या वर्षापासून शास्त्रीबुवांनीं 'मराठी कविता' ही लेखमाला सुरू केली. तीही 'संस्कृत कवि' ह्या लेखमालेइतकीच मान्यता पावली असती, पण त्या लेखमालेंत प्रारंभीं मिशनरी लोक व सरकारी अधिकारी ह्यांच्यावर विष्णुशास्त्री ह्यांनीं थोडी टीकेची टाकी चालविली होती. शिवाय शास्त्रीबुवा काळाचें बंधन पाळीत नसत. त्यामुळें सरकारी हुकूम शिक्षकांना मासिकांतून वेळेवर पोचत नसत. ह्या दोन्ही गैरसोयी टाळण्यासाठीं संपादक बदलले, तर कृष्णशास्त्री ह्यांजसारख्या प्रतिष्ठित माणसाला अपमान वाटावयाचा, म्हणून सरकारनें तें मासिकच बंद करून टाकलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



स्वाभिमानाचे स्फुलिंग

युरोपांतील मुलें बर्फाचा एक खेळ खेळतात. तिकडे बर्फ पुष्कळ, रस्तोरस्तीं पडलेलें. त्या बर्फाचे गोळे एकावर एक रचून शिराळशेटासारखा बुवा ते तयार करतात आणि नंतर चारी बाजूंनीं त्याला अग्नि लावतात. मग तो भरभर वितळूं लागतो आणि शेवटीं पार नाहींसा होतो. त्याचा मागमूसही राहात नाहीं. त्याची त्या मुलांना मोठी मजा वाटते. असाच खेळ महाराष्ट्रांतील दूरदर्शी पुढाऱ्यांनीं एकोणिसाव्या शतकांत सुरू केला. पारतंत्र्याचा हिम-पुरुष इंग्रजांनीं ह्या देशांत नाना रीतींनीं निर्माण केला होता. आमचें शिक्षण, आमचें आरोग्य, आमचें वैभव – ह्या देशाच्या सर्व अंगोपांगांमध्यें पारतंत्र्याचें तें बर्फ शिरलेलें होतें. तें काढून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टाकण्यासाठीं आणि पारतंत्र्याचा तो हिम-पुरुष वितळविण्यासाठीं स्वाभिमानाचा अग्नि चोहों अंगांनीं पेटविणें ख-या राष्ट्रभक्ताचें आद्य कर्तव्य होतें. तें ज्यांनीं पार पाडलें, त्यांत विष्णुशास्त्री ह्यांचें स्थान श्रेष्ठ आहे.

स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा ह्या तीनही बाबतींत स्वाभिमानाचे स्फुल्लिंग विष्णुशास्त्री ह्यांनीं धगधगीत पेटविले. ते स्वाभिमानाचे निखारे फुलविण्यासाठीं त्यांनीं निबंधमाळा, चित्रशाळा, किताबखाना, न्यू इंग्लिश स्कूल व केसरी-मराठा ह्या संस्थांचे भाते जोरानें चालविले. परिस्थितीचा हिम-प्रवाह अडवून धरण्याचें कार्य त्यांना करावयाचें होतें. स्वर्गातून पृथ्वीवर गंगा खालीं आणण्याचे भगीरथाचे प्रयत्न फार मोठे तर खरेच, पण परिस्थितीचा प्रवाह खालून वर नेणें हें कार्य त्याहीपेक्षां विकट. तें कार्य विष्णुशास्त्र्यांनीं अंगावर घेतलें व पार पाडलें.

सारे लोक पारतंत्र्याची अफू खाऊन गुंगींत पडलेले. शिकलेले तेवढे इंग्रजांचे भाट बनलेले. इंग्रजांचा पोषाख, इंग्रजांची भाषा, इंग्रजांचा आहार, इंग्रजांचा विहार – जें जें म्हणून इंग्रजांचें, तें तें मोलाचें, अशी भावना सर्वत्र पसरलेली. पूर्वीचीं पेंढारें नाहींत, बंडें नाहींत, दंगे नाहींत, उलट सर्वत्र शांतता आहे, काठीला सोनें बांधून काशीपासून रामेश्वरापर्यंत बिनधोक प्रवास करतां येत आहे, आगगाड्या भुतासारख्या धावत आहेत, तारायंत्रामुळें संदेश क्षणार्धांत पोचत आहेत, टपालाची सोय नामी झालेली आहे आणि स्वतःवर शिक्षण-रक्षण वा व्यापार-कारखाने कशाचीही जबाबदारी नाहीं, अशा पारतंत्र्याच्या 'सुखांत' सारे हिंदी लोक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोळत पडलेले होते. पाश्चात्यांच्या पाठीवरून आलेल्या यांत्रिक सुधारणांच्या झगझगाटानें शहाण्यांचेही डोळे दिपून गेले होते.

" आम्ही काय ? टोणपे. आमचे पूर्वज काय ? जंगली. नाना फडणीस काय ? आज असता तर वेडाच ठरला असता — पळून गेला असता. आणि इंग्रज ? आमच्यापेक्षां शंभरपट शहाणे. त्यांचें शहाणपण आम्हांला यावें म्हणून तर परमेश्वरानें त्यांची-आमची गांठ घालून दिली. ही ईश्वरी योजना आहे. आतां पांचशें वर्षें तरी इंग्रजांच्या अंमलाखालीं आम्हीं राहिलें पाहिजे, तरच आमची कांहीं सुधारणा होईल. " असे विचार एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत जोरानें वाहात होते. ते नाहींसे करून स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान व स्वभाषाभिमान ह्यांचे शुद्ध वारे महाराष्ट्रांत कसे खेळवावे हीच एक चिंता विष्णुशास्त्र्यांना रात्रंदिवस जाळीत होती.

बाहेरून पाहतां विष्णुशास्त्री शांत दिसत होते, इंग्रजी ग्रंथ वाचीत होते, सरकारी नोकरी करीत होते ; पण त्यांच्या मनांत केवढा ज्वालामुखी पेटला होता ! सरकारी शाळेंत निर्जीव शिक्षण बंदिस्त रीतीनें देतां देतांच, त्यांच्या डोक्यांत स्वाभिमानाचें शिक्षण कसें देतां येईल ह्याचे विचार चालत असत. १८७७ सालीं, ३१ तारखेस विष्णुशास्त्री रत्नागिरीस गेले. ही एक प्रकारें त्यांना शिक्षाच होती. त्यांनीं आपल्या निबंधमालेंतून इंग्रज लोकांवर जी टीका केली, ती शिक्षणाधिकाऱ्यांस झोंबली. ' इंग्रजी भाषा ' ह्या विषयावरील लेखांत त्यांनीं युरोपिअन इतिहासकारांवर कोरडे ओढले आहेत. त्यामुळें खवळून जाऊन एका युरोपिअनानें ' एलिफॅस '

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

(हत्ती) ह्या टोपण नांवानें ' बॉम्बे गॅझेट ' नांवाच्या वर्तमानपत्रांत शास्त्रीबुवांविरुद्ध लेख लिहिला आणि पुण्यांत एक राजद्रोही कट शिजत आहे असा आरोप केला. त्याला खरमरीत उत्तर विष्णुशास्त्री ह्यांनीं ' ज्ञानप्रकाशांतून ' इंग्रजी लेख लिहून दिलें. अकोल्याचे श्री. महाजनी ह्यांनींही मुंबईच्या ' टाइम्स'मध्यें सडेतोड उत्तर दिलें. पण सत्तेपुढें शहाणपण काय कामाचें ? सरकारी अधिकाऱ्यांनीं विष्णुशास्त्री ह्यांची उचलबांगडी केली आणि पुण्याहून रत्नागिरीस बदली केली.

ह्या बदलीचें घरगुती भाषेंत वर्णन शास्त्रीबुवांच्या वडिलांची म्हातारी मामी करीत असे. तिला शास्त्रीबुवांनीं रत्नागिरीस नेलें होतें. त्या मामी लोकांना सांगत, " माझा विष्णु किती शहाणा, किती थोरामोठ्याचा मुलगा, त्याच्या बापाचा केवढा नांवलौकिक, त्यांच्यासारखा शहाणा आहे कोण ? त्याचं आणि त्या साहेबाचं कुठें वाकडं आलं आणि त्यानें ह्याला इकडे दूर पाठवून दिलं ; नाहीं तर तो कुठला इतका लांब यायला ? " ह्याच घरगुती भाषेंत त्या विष्णुशास्त्र्यांची तारीफ मजेशीरपणें करीत. त्यांच्या शाळेंतील कामगिरीची व निबंधमालेंतील लेखन-कौशल्याची स्तुति मामींच्या कानीं दिवसभर येत असे. मग रात्रीं त्या विष्णुशास्त्र्यांना म्हणत, " काय रे विष्णु ! तुझा किती रे नांवलौकिक गांवभर आहे ? जें तें म्हणतं, तूं काय काय लिहितोस ! तुझा हात धरणारा कुणी नाहीं. तूं साहेबाविषयीं जर वाकडं लिहितास ना, तर एव्हांना कुठें तरी दोनशें चारशें रुपयांवर असतास ! खरंच का विष्णु ? "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माउलेची मोहिनी

टाळची सुट्टी होती. स्नेही-मंडळी सहज सहल म्हणून मौजेनें आळंदीस गेली होती. इंद्रायणीचें स्नान झालें. चांगदेवासाठीं चार भावंडांनीं चालविलेली भिंत पाहिली आणि ज्ञानोबांच्या समाधीचें दर्शनही घेतलें. दर्शन सर्वांनीं घेतलें, पण स्फूर्ति कोणाला मिळाली? केवळ विष्णुशास्त्री ह्यांना! त्यांनीं श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीवर आपलें मस्तक टेकलें, आणि तें वर उचललें तें जणुं कांहीं मातृभाषेच्या सेवेची स्फूर्ति घेऊनच! 'बाळपणींच सर्वज्ञता वरी' असा तो ज्ञानियांचा राणा! अगदीं 'जन्मतेनी प्रसंगें'पासून, समाजाचा छळ सोसूनही, तिरस्काराची एकही आठी कपाळावर उमटूं न देतां, सस्मित मुद्रेनें आणि अक्षय्य उल्हासानें समाजावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

सुखशांतीचें सिंचन करणाऱ्या श्रीज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी म्हणजे मराठी पद्याचा आद्य ग्रंथ. त्यापूर्वी मराठींत काव्यरचना होत नव्हती असें नाहीं. महानुभावांनीं पुष्कळ पद्यरचना केलेली आहे; पण नांव घेण्यासारखा पहिला मराठी काव्यग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरीच ! तसाच महत्त्व पावलेला मराठींतील पहिला गद्य ग्रंथ म्हणजे विष्णुशास्त्री ह्यांची 'निबंधमाला' ! त्यांच्या पूर्वीचें गद्य ग्रंथ म्हणजे मराठी गद्याचा अरुणोदय. पण सहस्रकरांनीं प्रकाशमान होणारा मराठींतील गद्यग्रंथ म्हणजे निबंधमालाच !

आळंदीच्या सफरींत, मित्रमंडळींच्या गप्पांत, 'निबंधमालेची' कल्पना निघाली. त्यानंतर कोणा वडीलधाऱ्या माणसाचा सल्ला घेणें किंवा थोरामोठ्यांचा आशीर्वाद मिळविणें, अथवा सरकारच्या आश्रयासाठीं लोटांगण घालणें, ह्यांपैकीं कोणत्याच फंदांत विष्णुशास्त्री पडले नाहींत. स्वभाषेची, स्वधर्माची व स्वदेशाची सेवा करण्याची ज्योत त्यांच्या अंतःकरणांत पूर्वीपासून पेटलेलीच होती. तिचें तेज 'शालापत्रकां'तील त्यांच्या लेखांतून प्रकटही झालेलें होतें. पण त्या तुटपुंज्या साधनांऐवजीं 'निबंधमाला' नांवाचें भरघोस मासिक काढण्याचें त्यांनीं निश्चित केलें. निश्चय झाला कीं कृति करावयाची हा त्यांचा बाणा. एक महिन्याच्या आंत मासिकाचा पहिला अंक काढण्यासाठीं त्यांनीं कमर कसली— 'ज्ञानप्रकाश' मध्यें जाहिरात फडकली.

"**विष्णु कृष्ण चिपळूणकर,** बी. ए." असें पूर्ण नांव त्यांनीं पहिल्या अंकावर घातलें—आणि फक्त पहिल्या अंकावरच घातलें. त्यानंतर त्यांनीं आपलें नांव 'माले'वर कधींच घातलें नाहीं !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' हा डौलदार लेख पहिल्या अंकांत चमकतांच महाराष्ट्रांतील विद्वान मंडळींचें लक्ष तिकडे वेधलें गेलें. मराठीला तुच्छ समजून मराठीची ओळही न वाचणारे शिक्षित लोक निबंधमालेच्या शैलीनें वेडावून गेले.

"वाक्यरचना सरळ असावी, अर्थ चांगला खुलासेवार मजेदार रीतीनें लिहिलेला असावा, असा कीं तो सहज मनांत भरून, वाचण्याची सारखी हौसच वाटत जावी. आणि एकंदर लिहिण्यांत आवेश किंवा झोकदारपणा असावा." असें उत्कृष्ट भाषापद्धतीचें वर्णन शास्त्रीबुवांनीं केलें आहे. तें खुद्द त्यांच्या लेखनशैलीला तंतोतंत लागू पडतें. वाचकाचें मत अनुकूल असो वा नसो, त्यानें विष्णुशास्त्र्यांची पहिली ओळ वाचली कीं तो मिटक्या मारीत लेखाच्या शेवटापर्यंत जावयाचाच. कोठें त्याच्या बुद्धीला गुदगुल्या होत, तर कोठें त्याच्या भावनांच्या तारा छेडल्या जात.

एकाहून एक देदीप्यमान असे ८४ अंक शास्त्रीबुवांनीं काढले. ते मराठी साहित्यांत अजरामर आहेत. कधीं वेळेवर, तर कधीं उशिरा, पण प्रत्येक अंक म्हणजे चमचमीत बौद्धिक मेजवानी देणारा काढावयाचा हें शास्त्रीबुवांचें धोरण. आपला विषय मनासारखा सजविला जावा म्हणून ते अंकाच्या नियमितपणाचें बंधन फारसें पाळीत नसत. दोन दोन, तीन तीन महिने अंक उशिरा निघत. शेवटीं तर बारा महिन्यांचा उशीर झाला! पण मालेचें प्रचंड, प्रसन्न व प्रभावी स्वरूप पाहिलें म्हणजे कोणालाही हा विलंब क्षम्य वाटेल – स्वाभाविकच वाटेल. एकएक निबंध म्हणजे एकएक ग्रंथच आहे. वाचकांच्या भिन्नभिन्न रुचींचें समाधान करण्यासाठीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मालेमध्यें विस्तृत निबंधाखेरीज संस्कृत सुभाषितें भाषांतरासहित दिलीं जात, 'विनोद व महदाख्यायिका' ह्या सदराखालीं थोर लोकांच्या चटकदार गोष्टी छापल्या जात आणि जगाच्या ज्ञानभांडारांतील उत्कृष्ट उतारेही मालेंत येत. हें सारें लेखन एक-हाती एक-टाकी असावयाचें. 'निबंधमाला' म्हणजे एकखांबी द्वारकाच ! तेथला अधिपति एक विष्णुच !

'निबंधमालेच्या' सात वर्षांच्या आयुष्यांत सुमारें पंचवीस विषयांवर शास्त्रीबुवांनीं निबंध लिहिले. त्यांत कांहीं कांहीं विषयांवर तर एकाहून अधिक अंक खर्ची घातले आहेत. इतिहास, लोकभ्रम ह्यांतील प्रत्येक विषयाला तीन अंक दिले आहेत. इंग्रजी भाषेनें चार व वक्तृत्वानें सहा अंक व्यापले आहेत. डॉ. जॉन्सन् हा माहितीनें भरलेला निबंध आठ अंकांत चालला होता. लोकहित-वादींवरील टीकेनें खमंग बनलेला निबंध तर बारा अंकांमध्यें पसरला आहे. म्हणजे एका निबंधाला पूर्ण एक वर्ष लागलें. आणि सर्वांत कळस केला मोरोपंतानें ! ह्या मराठीच्या शिवाजीनें मयूरकवीला तेरा अंकांचें मयूरसिंहासन मिळवून दिलें. मोठ्या आकाराचीं व बारीक अक्षराचीं दोनशें पानें हा निबंध भरला. ह्याचा अर्थ, ह्या आपल्या पुस्तकाचीं चारपांचशें पानें होतील. ग्रंथराजच झाला हा ! साऱ्या आयुष्यांत एवढा एकच ग्रंथ एखाद्या पदवीधरानें लिहिला असता तरी त्याला अस्मान ठेंगणें वाटलें असतें. आणि हल्लींच्या जाहिरातबाजीच्या काळांत तर काय ? त्याचा टोलेजंग प्रकाशन-समारंभ झाला असता आणि त्या निबंध-लेखकाचीं मोठमोठीं छायाचित्रें वर्तमानपत्रांतून झळकलीं असतीं !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'निबंधमालेचा' थाट असा कांहीं विलक्षण होता. तिची ती प्रौढ भाषा, तिच्यांतील ते मनोहर अलंकार, त्यांत गुंफलेलीं तीं पल्लेदार वाक्यें, जातांयेतां केलेला उपहास, मधूनमधून पेरलेल्या ऐतिहासिक कथा, वाचकाला बहुश्रुतपणाची जोड देणारे जगाच्या इतिहासांतील दाखले आणि इंग्रजी व संस्कृत काव्यांचा सर्वत्र विखुरलेला सुगंधी फुलोरा, ह्या सर्व गुणांमुळें निबंधमालेनें महाराष्ट्रीय वाचकांचें मन पुरें जिंकलें. तरुण वाचकांच्या तर मालेवर उड्या पडत. नवा अंक केव्हां येतो ह्याची ते वाट पाहात. उशीर झाला कीं ते चरफडत, मालाकारांकडे तक्रारही करीत. पण उशीरा आलेला अंक हातांत पडतांच त्यांचा निम्मा राग नाहींसा होई. अंक वाचून होतांच त्यांच्या मनांतील रागाची जागा आदराला मिळे आणि त्यांच्या तोंडून, 'धन्य धन्य!' असे उद्गार निघूं लागत. निबंधमालेनें मराठी भाषेला राजैश्वर्य दिलें. महाराष्ट्र-शारदेला सोन्याच्या पालखींत बसवून, मंदमंद गतीनें वाहून नेणारा व सोन्यारुप्याच्या फुलांनीं शृंगारलेला, डौलदार पण शक्तिशाली गजराजच जणुं कांहीं 'निबंधमालेच्या' रूपानें अवतीर्ण झाला.

निबंधमालेंतील विषयांमध्यें मराठी भाषेवर जास्त निबंध आलेले आहेत. भाषापद्धति, भाषादूषण, भाषांतर, लेखनशुद्धि, वाचन, टीका, विद्वत्त्व, कवित्व, इत्यादि विषयांचें तात्त्विक विवेचन त्यांत केलेलें आहे. ह्याशिवाय तारा, टेंपेस्ट, वेदार्थयत्न, इत्यादि ग्रंथांवर प्रत्यक्ष टीकाही केलेली आहे. गर्व, संपत्तीचा उपभोग, असे विषय थोडे. 'आमच्या देशाची स्थिति' हा शेवटचा निबंध सरकारनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तीन वर्षांनंतर जप्त केला. शास्त्रीबुवा कोणत्याही विषयावर लिहीत असोत, त्यांतून त्यांचे देशाभिमानाचे विचार डोकावल्याशिवाय राहात नसत. कारण निबंधमाला काढण्याचा त्यांचा उद्देशच मुळीं "असत्यरूप व भ्रांतिरूप धुकें जें ह्या देशभर आजपर्यंत पसरून राहिलें आहे त्याचें निरसन करून सत्यरूप सूर्याचा व ज्ञानाचा खरा उदय व्हावा" हा होता. त्यांनीं भाषाविषय हाताळले ह्याचेंही कारण राष्ट्रोद्धाराची तळमळ हेंच. "भाषेची अभिवृद्धि ही देशाच्या उत्कर्षाचें एक मोठेंच साधन" असल्याची ग्वाही त्यांनीं पहिल्याच अंकांत पहिल्याच पानावर दिली आहे. पुढें जॉन्सनवरील निबंधांत, आपल्या सुशिक्षित देशबांधवांस उपदेश करतांना शास्त्रीबुवा अलंकारिक भाषेंत लिहितात,

"भाषारूप उपवनास आपल्या ज्ञानोदकाचें सिंचन निदान आरंभीं तरी त्यांनीं केवळ निरपेक्ष बुद्धीनें केलें पाहिजे. कालेंकरून त्यांच्या श्रमाचा परिपाक कीर्तिरूप सुमनांनीं व अर्थरूप फलांनीं प्रगट होईलच होईल; पण ह्या अदृष्ट लाभावर नजर न देतां पहिल्यानें केवळ आपलें कर्तव्यच म्हणून त्यांनीं हातांत लेखणी धरली पाहिजे."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"मराठीचा शिवाजी"

आपल्या भाषेविषयींचा, "अलीकडील विद्वानांचा ग्रह कांहीं अंशीं तरी मोडून टाकण्यास जर आमचे निबंध कारण झाले, तर आमच्या हातून देशहिताचें एक मोठेंच कृत्य घडलेंसें आम्ही मानूं." अशी आपली भूमिका शास्त्रीबोवांनीं प्रारंभींच मांडलेली आहे. त्यांच्या लेखनाची बैठकच अशी होती कीं "आमच्या देशाची सांप्रत काळीं अत्यंत निकृष्ट अवस्था आली असल्यामुळें तो सगळ्या जगाच्या व विशेषेंकरून बहुतेक इंग्लिश लोकांच्या दृष्टीनें केवळ अवहेलनेसच पात्र झाला आहे. तर जे खरे देशाभिमानी असतील व सत्यनिष्ठ असतील, त्यांनीं वरील निंदेनें बिलकुल खचून जाऊं नये आणि मेकॉलेसारख्यांच्या मोठ्या नांवास भिऊन न जातां

CC-0. In Public Domain, Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व मिशनरी, पाद्री, बाटे, वगैरे लोकांच्या शिव्यांस व रागास अगदीं न जुमानतां आपल्या देशावर वरील लोकांनीं जीं अज्ञानमूलक व दुराग्रहजन्य परोपरीचीं दूषणें बळेंच जाणूनबुजून दिलीं आहेत त्यांचें यथास्थित खंडन करावें. असें केलें असतां त्यांचे ह्याच देशावर तर काय, पण एकंदर सगळ्या जगावरही मोठे उपकार होतील."

आपल्या कार्याविषयीं शास्त्रीबुवांना असा आत्मविश्वास वाटत होता कीं "आम्हांस जो सत्याचा व देशहिताचा मार्ग दिसत आहे त्यांस अनुसरणें हेंच आम्हांस प्राप्त झालेल्या विद्येचें चीज होय व त्यास सध्या कितीही अडथळे आले व लोकांच्या मनांत त्याविषयीं कितीही कुत्सित कल्पना आल्या; तरी त्याची योग्यता उत्तरोत्तर यथार्थपणें प्रगट होत जाईल हा आमचा कृतनिश्चय आहे."

त्या वेळचे विद्वान मातृभाषेकडे पाठ फिरवून इंग्रजी भाषेचा उदो उदो करण्यांत कसे गुंग असत, हें सांगतांना शास्त्रीबुवा म्हणतात, "नांव लिहायचें झालें तर पुढें हात-सव्वा हात किताब; देशाभिमानाचा तर पहिल्या प्रतीचा बाणा; देश-कल्याणाचें कोणतेंही काम निघो, त्यांत प्रमुख मंडळींत नांव; पण देशभाषेंत जर चार शब्द बोलण्याचा किंवा लिहिण्याचा प्रसंग आला, तर बहुधा प्राणसंकटच!"

राजकीय दृष्ट्या हिंदुस्थान परतंत्र झालेला, त्याला मानसिक दृष्ट्याही परतंत्र करूं पाहाणारे जे जे कोणी स्वकीय वा परकीय लोक शास्त्रीबुवांना आढळले, त्यांचा त्यांचा त्यांनीं खरपूस समाचार घेतला. हिंदुस्थानची दानत, नीतिमत्ता, बुद्धिवैभव, शौर्य, वगैरे

CC-0. In Public Domain. Gurukul Kàngri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

सर्व गुणांवर डांबर फासणाऱ्या मेकॉलेची टर ते कधीं उडवीत, तर हिंदु धर्माला तुच्छ लेखणाऱ्या ख्रिस्ती मिशनऱ्यांची रेवडी उडवीत. आमच्यांतले जे शिकलेले लोक पाश्चात्यांचे पूजक बनून मातृभूमीची निंदा करीत आणि सर्वत्र स्वाभिमानशून्यतेचें वातावरण पसरवीत; त्यांची चांगलीच हजेरी शास्त्रीबुवांनीं घेतली आहे. ह्या बोलक्या सुधारकांचा उपहास शास्त्रीबुवा कसा मर्ममेदकपणें करीत ह्याचा नमुना म्हणून 'गर्व' निबंधांतील एकदोन वाक्यें येथें दिलीं असतां पुरे होईल. "ज्ञानामृताचा पेला तोंडाशीं नेऊन त्याचा एक घुटकाच नुकता आम्हीं कोठें घेतला न घेतला तों इतक्यांतच चोहोंकडे एकदम केवढाले चमत्कार झाले आहेत पाहा!" असें मिस्किलपणानें म्हणून व त्या चमत्कारांचें गमतीदार वर्णन करून शेवटीं शास्त्रीबुवा लिहितात, "हजारों महाकवींचे वीणे सज्जून सर्वांचा एकसमयावच्छेदेंकरून नाद घुमूं लागला असतां व हजारों महावक्त्यांची एकदम गर्जना सुरू झाली असतां आकाशमंडप लवकरच खालीं येईल कीं काय, कोण जाणे!"

शास्त्रीबुवांनीं 'निबंधमाला' सुरू केली, ती वयाच्या ऐन पंचविशींत. तिला भराभर लोकाश्रयही मिळत चालला आणि अनुकूल व प्रतिकूल पक्षांत तिचा गाजावाजाही खूप झाला. त्यामुळें त्यांचें सारें लिहिणें मोठें उमेदीचें, ऐटीचें व आत्मविश्वासाचें आहे. त्याबरोबरच प्रौढ वयांतील खोल विद्वत्ता व समतोल मांडणी, ह्यांचा अभावही पुष्कळ ठिकाणीं जाणवतो. पण कच्च्या कैरींत पिकलेल्या आंब्याचा मधुर रस कोठून येणार? तिची चव आंबटच असणार. परंतु त्या आंबट चवीनेंच पुष्कळांच्या तोंडाला पाणी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुटे. तथापि आपल्या समाजांतील जुन्या दुष्ट चालीरीतींवर व लोकभ्रमावर कडक टीका करण्यास ते कचरले नाहींत.

आमची भाषा सामर्थ्यवान, आमचा धर्म उदार आणि आमचा देश संस्कृतिसंपन्न, अशी स्वाभिमानाची ज्योत शास्त्रीबुवांनीं पेटविली; एवढेंच नव्हे, तर त्या ज्योतीवर परदास्यानें आलेली काजळी कशी झाडून टाकावी ह्याचा उपदेश त्यांनीं 'निबंधमालें'तून केला. उपदेश करूनच ते थांबले नाहींत, तर प्रत्यक्ष आचार करून त्यांनीं इतरांना तसा कित्ता घालून दिला. निबंधमाला म्हणजे मराठी गद्याची गंगोत्री आहे, पारतंत्र्याचें जाळें उडवून लावणारा झंझावात आहे, सत्त्वाचा संजीवनी-मंत्र आहे! पावनखिंडींत प्राणपणानें झुंजणाऱ्या बाजीप्रभूच्या शौर्यानें, आठ वर्षें आपल्या भाषेच्या, देशाच्या व धर्माच्या हितशत्रूंशीं सामना देणारे विष्णुशास्त्री हे आजच्या आपल्या स्वातंत्र्याचे एक संस्थापक खचित आहेत. त्यांचें शस्त्र तिखट असलें, तरी तें सत्याच्या व राष्ट्रहिताच्या बाजूनेंच चालविलें गेलें हें लक्षांत घेतलें पाहिजे. आठ वर्षें असें स्फूर्तिदायक वाङ्मय एकट्यानें निर्माण केल्याचा दाखला महाराष्ट्रांत तरी दुसरा नाहीं. खुद्द शास्त्रीबुवांनींच मालेच्या अखेरीस असे उद्गार काढले आहेत कीं "गेल्या आठ वर्षांत जो आम्हीं अव्याहत उद्योग केला त्याला आमच्याच देशांत काय, पण पाश्चात्य देशांतही तोड सापडणार नाहीं, असें म्हटलें असतां गर्वोक्ति केल्याचा दोष माथीं येईल असें आम्हांस वाटत नाहीं."

नुसते ज्ञानकोश रचणारे किंवा साम्राज्यांचे इतिहास लिहिणारे बडे बडे ग्रंथकार जगाच्या पाठीवर चमकतांना दिसतात; पण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शास्त्रीबुवांची साहित्यसेवा ही स्वातंत्र्यसेवा होती आणि ती त्यांनीं एकट्यानें चालविली होती, हें त्यांचें वैशिष्ट्य बिनतोड आहे खरेंच! म्हणूनच मालेचे तीस अंक लिहून झाल्यानंतर ते आपल्या बंधूपाशीं सहजगत्या मनांत उठलेला अभिमानाचा तरंग बोलून गेले, 'I am the Shivaji of the Marathi language, who had not his equal either to precede or succeed him!" "पूर्वी झाला नाहीं व पुढें होणार नाहीं असा मराठी भाषेचा शिवाजी मी आहें." ह्या शास्त्रीबुवांच्या विधानांत अभिमानापेक्षां सत्याचाच अंश अधिक आहे हें कोण कबूल करणार नाहीं? त्यांच्यानंतर राजवाडे, टिळक, आगरकर, केळकर, परांजपे, पांगारकर, सावरकर, कोल्हटकर, हरिभाऊ आपटे, विनोबा भावे वगैरे कितीतरी रथी-अतिरथी मराठी साहित्याच्या आघाडीवर उभे राहिले; पण ते सर्व ह्या शिवछत्रपतीचे सेनापतिच शोभण्यासारखे आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



संस्थांचें यश

सरकारी नोकरीच्या पिंजऱ्यांत चडफडणारी शास्त्रीबुवांची बुद्धि १८८० सालीं बंधमुक्त झाली. रत्नागिरीहून सहा महिन्यांची रजा घेऊन ते पुण्यास आले, तें मनानें शिक्षकीला कायमचा रामराम ठोकूनच !

जॉन्सनवरील निबंधांत शास्त्रीबुवांच्या मनाचें प्रतिबिंब पडलेलें आहे. एका खाजगी शाळेंत जॉन्सन् दुय्यम शिक्षक म्हणून काम करीत होता. त्या शाळेचे "सरमास्तर स्वभावानें मोठे गर्विष्ठ व तिरसरखां होते." हाच अनुभव शास्त्रीबुवांना आला होता. पण जॉन्सनूनें "खाडदिशीं चाकरीला लाथ मारली व स्वतंत्र शाळा काढली." हा जो पराक्रम त्यानें केला, तो शास्त्रीबुवांच्या हातून अजून व्हावयाचा होता. १८७९ च्या सेप्टेंबर महिन्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांनीं आपले बंधु लक्ष्मणराव ह्यांस पत्र लिहून कळविलें कीं, "आतां मी माझ्या शृंखला तोडण्याचा आनंद उपभोगणार. येत्या जानेवारीपासून आमचें निशाण फडकवणार ! टिळक–आगरकर-प्रभृति पदवीधरांच्या तोफखान्यापुढें सरकारी हायस्कूल हां हां म्हणतां जमीनदोस्त होईल !" केवढा दांडगा हा आत्मविश्वास ! आणि तो प्रगट करण्याची ऐट तरी केवढी ! नवीन इंग्रजी शाळा आपण काढणार, हें आपल्या भावाला खाजगी पत्रानें कळवितांना जर भाषेचा हा डौल, तर जाहीर रीतीनें त्यांनीं आपल्या कार्याचा पुरस्कार कसा केला असेल ? 'निबंधमाले'च्या एका अंकांत ते अभिमानानें लिहितात, "आमचें इतःपर स्थानान्तर करण्याचें सामर्थ्य कोणामध्येंही राहिलें नाहीं. आम्हांस ह्यापुढें हेडमास्तरांचा रिमार्क, इन्स्पेक्टरसाहेबांचा रिपोर्ट, किंवा मेहेरबान डायरेक्टर-साहेबांची ऑर्डर ह्यांपैकीं कशाचाही तिळमात्र धाक बाळगण्याचें कारण उरलें नाहीं. ... आतां इंग्रज ग्रंथकार, संस्कृत ग्रंथकार व मराठी ग्रंथकार आहेत आणि आम्ही आहोंत ! तिसरा कांटा म्हणून आतां कोणताही उरला नाहीं." ह्या उद्गारांत मुक्ततेचा आनंद आणि भावी कार्याविषयींची हिम्मत प्रकट झाली आहे.

ह्याच सुमारास "अज्ञान-ध्वंसनाविषयीं केवळ वज्रच" असा 'आर्यभूषण' छापखाना शास्त्रीबुवांनीं सुरू केला आणि त्यांत 'निबंधमाला' छापण्यास प्रारंभ केला. ६६ व्या अंकापासून अखेरपर्यंत निबंधमाला ह्या स्वतःच्याच छापखान्यांत छापली जात होती. त्यापूर्वी मात्र तिला तीन छापखान्यांतून हिंडावें लागलें. हा बदल शास्त्रीबुवा किती प्रौढीनें सांगतात पाहा : "आजपर्यंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आम्हांस भाड्याचा रथ आणून युद्धप्रसंग करण्याची जी पाळी येत असे, ती स्थिति जाऊन आतां आमचा स्वतःचा खास रथ पूर्णपणें सज्ज होत आहे." स्वतःचें पत्र, स्वतःचा छापखाना, स्वतःची शाळा, स्वतःचें पुस्तकालय, स्वतःचें चित्रालय, असा स्वत्त्वाचा लखलखाट ह्या स्वातंत्र्यसूर्यानें सर्वत्र पसरून दिला.

तारीख १ जानेवारी १८८० रोजीं, पुण्यांतील मोरोबादादा फडणवीस ह्यांच्या वाड्यांत, शास्त्रीबुवांनीं "न्यू इंग्लिश स्कूल" उघडलें. आदल्या रात्रीं, त्यांची चुलती कॉलऱ्यानें आजारी पडल्यामुळें त्यांना जागरण घडलें होतें. पण शास्त्रीबुवा संकल्पित वेळेला वाड्यांत आले व उत्साहानें इंग्रजींत भाषण करून शाळेच्या स्थापनेचा समारंभ त्यांनीं साजरा केला. ह्या दिवशीं, शास्त्रीबुवा, टिळक व नामजोशी हे तिघेच शिक्षक हजर होते. आगरकर वगैरे मागाहून येणार होते. शास्त्रीबुवांच्या नांवानें वेधले गेलेल्या दीडशें मुलांनीं पहिल्याच दिवशीं नांवें नोंदविलीं.

रत्नागिरीहूनही कांहीं हुशार मुलें शास्त्रीबुवांच्या शाळेंत येऊन दाखल झालीं. मुलांची संख्या भराभर वाढत गेली. मे महिन्यांत ती पांचशेंपर्यंत पोचली. मेची सुट्टी होण्यापूर्वी शास्त्रीबुवांनीं केलेल्या भाषणांत ह्या यशाचा गौरवपूर्वक उल्लेख आहे. त्याच्या आधीं सरकारी हायस्कूलच्या हेडमास्तरनें सरकारकडे असा रिपोर्ट केला होता कीं "येथें कांहीं उनाड व हुच्या तरुण लोकांनीं एक नवीन खाजगी शाळा काढल्यामुळें तूर्त ह्या शाळेंतील संख्या कमी झाली आहे; परंतु अशा शाळांची स्थिति केवळ पावसाळ्यांतील कुत्र्यांच्या झाडांप्रमाणें क्षणिक असल्यामुळें आमच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शाळेची संख्या नेहमींची कमी होण्याची फारशी भीति नाहीं." ह्या टवाळीला रोखठोक उत्तर शास्त्रीबुवांनीं आपल्या भाषणांत दिलें आणि विद्यार्थ्यांना देशप्रेमाच्या प्रेरणेनें थरारून सोडलें.

शास्त्रीबुवांचें बळ अशा नुसत्या वक्तृत्वांत नव्हतें, तर रोकड्या कर्तृत्वांत चमकत होतें. त्यांच्या शाळेचा उत्कर्ष जसा संख्येमध्यें दिसून येत होता, तसाच गुणांमध्यें दिसून येऊं लागला. पहिल्याच वर्षीं मॅट्रिकच्या परीक्षेस सोळा विद्यार्थी बसले व त्यांपैकीं बारा उत्तीर्ण झाले. त्यांतही एका विद्यार्थ्यानें जगन्नाथ शंकरशेटची संस्कृतची बहुमानाची शिष्यवृत्ति सर केली. शास्त्रीबुवांच्या अंगावर मूठभर मांस चढलें. शिवाजीनें जणूं कांहीं तोरणा किल्लाच जिंकला !

शाळा जसजशी नांवालौकिकाला चढूं लागली, तसतसे बुद्धिमान शिक्षक तिला मिळूं लागले एवढेंच नव्हे, तर समाजांतील धुरंधर विद्वान तिच्यावर प्रशंसेची पुष्पांजलि करूं लागले. दुसऱ्याच वर्षीं शाळेची तपासणी करून प्रो. वर्ड्स्वर्थ ह्यांनीं असे उद्गार काढले कीं "शाळेनें मिळविलेलें यश पाहून मला खरोखरच आश्चर्य वाटतें. तिच्या पाठीमागील भावनेचा चिरस्मरणीय परिणाम हिंदुस्थानच्या भावी इतिहासावर झाल्याशिवाय राहाणार नाहीं !" सर वुइल्यम हंटर ह्या शिक्षणाधिकाऱ्यानेंही अशी तारीफ केली कीं "हिच्या तोडीची एकही शाळा मला सर्व हिंदुस्थानांत दिसून आली नाहीं." ह्या वर्षीं न्या. तेलंग हे तर शाळा पाहून उद्गारले, "मलाही तुम्हांमध्यें येऊन मिळावेंसें वाटतें. मात्र माझी दोन लाखांची पुंजी पुरी झाली पाहिजे." ती पुंजी कधीं जमली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं आणि तेलंगांची जोड शाळेला कधीं मिळाली नाहीं ही गोष्ट निराळी !

सरकारी शाळा काय नि खाजगी शाळा काय, शिक्षणांत फरक तो काय होणार ? दोन्हीकडे बे दुणे चारच शिकविले जाणार ना ? अशी शंका कांहीं पलंग-पंडित काढीत असत. त्या शंकेचें खंडन शास्त्रीबुवांनीं यथास्थित केलें आहे. परतंत्र हिंदुस्थानच्या इतिहासाची, धर्माची, भाषेची, सर्वच अंगांची हेटाळणी करणारे मेकॉलेप्रभृतींचे उतारे शाळेंत नेमलेले असत. ते शिकवितांना त्यांतील कुविचारांचा विस्तार शिक्षक सहजच करीत. पण शास्त्रीबुवांच्या शाळेंत उलट घडे. त्या दुष्ट विचारांतील दोष दाखवून विद्यार्थ्यांना सत्यज्ञान देण्याचें व त्यांच्यामध्यें स्वाभिमान उत्पन्न करण्याचें कार्य शास्त्रीबुवांच्या शाळेंत होई.

हें कार्य शाळेंत विद्यार्थ्यांपुरतें घडे, पण शाळेंतील विद्यार्थ्यांपेक्षां प्रौढ असा जनसमाज कितीतरी अफाट आहे ; त्याला कर्तव्याचे धडे, स्वाभिमानाची शिकवण कोण देणार ? त्यासाठीं वर्तमानपत्र काढण्याचें शास्त्रीबुवांनीं ठरविलें. "देशस्थिति सुधारण्याचा राजमान्य मार्ग म्हटला म्हणजे लोकांना ज्ञानसंपन्न करणें होय." अशी त्यांची ठाम समजूत. त्यासाठीं जशी शाळा, तसेंच वर्तमान-पत्र अवश्य. म्हणून 'केसरी' व 'मराठा' हीं दोन वर्तमानपत्रें शास्त्रीबुवांनीं काढलीं. ता. ४ जानेवारी १८८१ रोजीं केसरी हें मराठी साप्ताहिक श्री. आगरकरांच्या संपादकत्वाखालीं सुरू झालें आणि त्याच्या आधीं दोन दिवस 'मराठा' हें इंग्रजी साप्ताहिक लो. टिळकांच्या संपादकत्वाखालीं निघालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यापूर्वी मराठींत वर्तमानपत्रें होतीं, नाहीं असें नाहीं, पण शास्त्रीबुवांच्या ह्या पत्रांचें पाणी कांहीं निराळेंच. "सदर पत्रांतील लेख, त्यांस ठेवलेल्या नांवाप्रमाणेंच येतील" असें त्यांनीं उद्देश-पत्रकांतच जाहीर केलें होतें. सुरुवातीसच त्याच्या अठराशें प्रती खपूं लागल्या आणि आठनऊ महिन्यांनंतर तो आंकडा पस्तीसशेंवर गेला. शास्त्रीबुवा 'केसरीं'तून प्रार्थनासमाज, जातिभेद, देशोन्नति अशा विषयांवरच लेख लिहीत. पण टिळक-आगरकर राजकीय विषय झोडपून काढीत. त्यांतूनच पुढें कोल्हापूर-प्रकरण उद्भवलें. कोल्हापूरचे दिवाण श्री. बर्वे छत्रपतींचा छळ करतात अशा तक्रारी केसरीकडे आल्या. त्या त्यांनीं निर्भयपणें छापल्या. त्यामुळें आपली अब्रुनुकसानी झाली असें म्हणून श्री. बर्वे ह्यांनीं टिळक-आगरकरांवर फिर्याद केली. खटल्याच्या वेळीं त्यांना त्यांच्या मित्रांनीं तोंडघशीं पाडलें व पुरावा मिळूं दिला नाहीं. म्हणून ता. १७ जुलै १८८२ रोजीं टिळक-आगरकरांना चार महिने कैदेची शिक्षा झाली. ती त्यांनीं मुंबई-जवळील डोंगरीच्या तुरुंगांत भोगली. ह्या खटल्याशीं शास्त्रीबुवांचा संबंध कायदेशीर वा नैतिक कसलाही नव्हता. तरी त्या घोरपडीची चिंता त्यांना लागलीच होती.

शाळा उघडली, वर्तमानपत्रें काढलीं, तरी शास्त्रीबुवांना नवीं नवीं कार्यें सुरू करण्याची जरूरी वाटतच होती. अडाणी लोकांना चित्रांची भाषा समजते, तेव्हां आपल्या देवांचीं, आपल्या संतांचीं, आपल्या पुढाऱ्यांचीं चित्रें काढून त्यांचा प्रसार जनतेंत करावा, ह्या हेतूनें १८७२ सालीं त्यांनीं 'चित्रशाळा' सुरू केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
****

शिळाप्रेसचा हा छापखाना सुरू करण्यासाठीं चारशें रुपयांचें भांडवल शास्त्रीबुवांनींच दिलें. रामपंचायतनाचें चित्र बाहेर पडतांच त्यावर गिऱ्हाइकांच्या उड्यांवर उड्या पडल्या. नंतर देवादिकांच्या तसबिरी भराभर निघूं लागल्या. गिऱ्हाइकांची मागणी फार असल्यामुळें तसबिरींची नेहमीं चणचणच राही.

ह्याच सुमारास पुण्यांतील सरकारी बुकडेपो जळाला. तेव्हां १८७९ च्या जुलै महिन्यांत शास्त्रीबुवांनीं 'किताबखाना' नांवाचें पुस्तकविक्रीचें दुकान काढलें. त्याच वेळीं, जुनीं काव्यें व बखरी ह्यांचा जीर्णोद्धार करण्यासाठीं शास्त्रीबुवांनीं 'काव्येतिहास-संग्रह' नांवाचें मासिक काढलें. ह्या सर्व कार्यांत त्यांनीं निरनिराळे सहकारी घेतले असले, तरी त्या सर्वांना प्रेरणा देण्याचें व मार्गदर्शन करण्याचें श्रेय शास्त्रीबुवांचेंच ! एखाद्या कारखान्यांत शेकडो चक्रें फिरत असलीं तरी त्यांना गति देणारी वाफ किंवा वीज ही एकच शक्ति असते. खुद्द शास्त्रीबुवाच आपल्या ह्या नानाविध उद्योगांविषयीं लिहितात, 'निबंधमाला' आहे, 'चित्रशाळा' आहे, 'किताबखाना' आहे, 'न्यू इंग्लिश स्कूल' आहे, 'केसरी' आहे, 'मराठा' आहे, 'छापखाना' आहे, हें आहे तरी काय ? इतकीं कामें कोठे बोललीं आहेत !"

नुसतीं बोललींच नव्हे, तर इतकीं कामें शास्त्रीबुवांनीं करून दाखविलीं आहेत आणि तींही अवघ्या बत्तीस वर्षांच्या आयुष्यांत पार पाडलीं आहेत ही त्यांची शहामत. त्यांचें भाग्य इतकें थोर कीं "आजही वरील बहुतेक उद्योग फलोन्मुख झाले आहेत."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशी तृप्तीची ढेकर त्यांना देतां आली. त्यासाठीं त्यांनीं किती श्रम केले असतील, ह्याची कल्पना कोणाला आहे ! "गेल्या दशकांत, कागदाला टोंक लागल्याव्यतिरिक्त आमचे फारच थोडे दिवस गेले असतील" असें त्यांनीं जें लिहिलें आहे, त्यावरून त्यांच्या परिश्रमांची थोडीबहुत कल्पना येऊं शकेल. १८८१ सालीं, निबंधमालेचें काम पुरें करून 'ग्रंथमाला' सुरू करण्याच्या विचारांत शास्त्रीबुवा होते. पण दैवाची योजना निराळीच होती. "माला-ग्रथनाच्या कार्यांत विराम करण्याचें" त्यांनीं योजलें होतें. पण नियतीनें त्यांच्या जीवन-ग्रंथालाच पूर्णविराम देण्याचें योजलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



दुसरा ज्ञानेश्वर

१५ जानेवारी १८८२ रोजीं, घरच्या मंडळींचें छायाचित्र काढण्याचें शास्त्रीबुवांच्या मनांत आलें. लष्करांतील एक हुशार पोर्तुगीज फोटोग्राफर घरीं बोलावून आणला. त्यानें प्रथम केवळ बायकांचा असा एक स्वतंत्र फोटो काढला. दुसऱ्या दिवशीं पुरुषमंडळींचा फोटो काढावयाचा. त्यासाठीं ते सारेजण लष्करांत फोटोग्राफरच्या घरीं गेले. दोन फोटो घेतले. शास्त्रीबुवांचा एकट्याचा स्वतंत्र फोटो काढावा, अशी इच्छा मंडळींना झाली. त्याप्रमाणें शास्त्रीबुवा एकटे उभे राहिले. त्या काळांत फोटो काढण्याचें काम फार जिकिरीचें. शास्त्रीबुवांना उन्हांत बराच वेळ उभें राहावें लागलें. त्यामुळें त्यांस घेरी आली. ते जमिनीवर पडले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तोंडास दुखापत झाली. कानांतून रक्त आलें. दोन दांत दुखावले. घरीं आल्यावर हातापायांची आग होऊं लागली. बारीक तापही येऊं लागला. महिना दीड महिना ते शाळेंत जाऊं शकले नाहींत. घरीं पडल्या पडल्या 'केसरींत' लेख लिहीत. त्यांतच कोल्हापूरचा खटला फेब्रुवारीपासून सुरू झाला. त्याची काळजी त्यांना वाटूं लागली. तथापि ता. ९ मार्च रोजीं त्यांना थोडी हुशारी वाटूं लागली, म्हणून ते शाळेंत गेले. पण थोडेंसें काम करतांच त्यांना फार थकवा वाटला. शाळेंतून ते लवकर घरीं आले. वैद्याचें औषध चालू होतें.

अशा स्थितींतही शास्त्रीबुवांच्या मनांत आपल्या आईचा दरारा किती असे, ह्याचें एक लहानसें उदाहरण घडलें. संध्याकाळची वेळ. शास्त्रीबुवांना ताप चढूं लागला. तासाभरानें जेवणाकरतां भात आणला. त्यांचे चुलत बंधु त्यांना तो भरवूं लागले. शास्त्रीबुवा कोचावर बसल्या बसल्याच भात खात होते. इतक्यांत आईचा शब्द कानीं आला. लगेच शास्त्रीबुवा कोचावरून धडपडून उठून खालीं पाटावर जाऊन बसले. कोचावर बसून जेवतांना आपल्याला आईनें पाहिलें तर ती बोलेल हा त्यांना धाक !

भात खाऊन शास्त्रीबुवा कोचावर पडले. ताप वाढत चालला. त्यांत वात झाला. ते हवें तें बडबडूं लागले. रात्रीं दहा वाजतां डॉक्टर आले. त्यांनीं नळी लावून पाहिलें, तों ताप १०७° पर्यंत. वाताचा विकार बळावलेलाच. नंतर वैद्य आले. त्यांनीं काढा दिला. पण आयुष्याची दोरीच तुटली होती. पहाटे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साडेपांच वाजतां शास्त्रीबुवांची प्राणज्योत मालवली. तो दिवस गुरुवार, तारीख १७ मार्च १८८२ हा होता.

'मालाकारां'च्या निधनाची बातमी वणव्याप्रमाणें पसरली. ती कानीं पडतांच पुण्यांतील शेकडों लहानथोर स्त्रीपुरुष डोलकर आळींतील त्यांच्या घराकडे धावत सुटले. त्यांचे गुरु, त्यांचे सहकारी, त्यांचे विद्यार्थी, त्यांचे वाचक, असा प्रेमबंधानें जोडलेला असंख्य लोकांचा परिवार तेथें जमला, दुःखी झाला. अल्पवयांत हा महापुरुष, आपल्याला आगाऊ कल्पना नसतांना, एकाएकीं स्वर्गीं निघून गेला, ह्यामुळें लोकांना शोकाचा मोठा उमाळा आला.

"महाराष्ट्र-भाषेचा दुसरा ज्ञानेश्वरच आज दिवंगत झाला" असे उद्गार मराठी भाषेच्या भक्तांनीं काढले.

"आज महाराष्ट्र-वाणीचा पति परलोकवासी झाल्यानें ती गतभर्तृका झाली. महाराष्ट्रीयांनीं अद्वितीय रत्न गमावलें." असें वर्णन आगरकरांनीं 'केसरीं'त केलें.

"उद्योग, सदाचरण, नियमितपणा, देशाभिमान, वगैरे गुण संपादन करण्याचा सुशिक्षितांनीं प्रयत्न केला पाहिजे, अशी जर आज थोडी-बहुत समजूत झाली असली तर तिचें प्रवर्तकत्व शास्त्रीबुवांकडेच येतें." असें मूल्यमापन लोकमान्य टिळकांनीं वीस वर्षांनंतर केलें.

"चिपळूणकर हे हिंदुस्थानचे एक सन्मान्य नागरिक होते. त्यांचें साहस व उत्साह अलौकिक होता. ह्या गुणांचा उपयोग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांनीं लोकसेवेसाठीं केला. ह्याचें महत्त्व हिंदुस्थानांत फारच आहे. पुढेंमागें हिंदुस्थान स्वराज्य-संपन्न देश होईल, त्याचें श्रेय त्या ध्येयासाठीं झटणारे कार्यकर्ते निर्माण करणाऱ्या प्रगतीच्या ह्या अग्रदूताला – चिपळूणकरांना – आहे." असें गुणवर्णन लंडनच्या "ग्राफ्रिक" पत्रानें केलें.

जगज्जेता शिकंदर, धर्म-संस्थापक येशू ख्रिस्त, महान तत्त्वज्ञ श्रीशंकराचार्य ह्या अलौकिक विभूतींनीं वयाच्या बत्तिसाव्या वर्षींच कृतकार्य होऊन आपली जीवितयात्रा संपविली. त्यांच मालिकेंत मालाकारांनीं कायमचें व मानाचें स्थान मिळविलें.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुष्यांतील ठळक प्रसंग

सन

१८५० — जन्म, पुणें येथें ता. २० मे रोजीं.

१८६५ — मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण.

१८६५ — विवाह.

१८७१ — बी. ए. झाले.

१८७३ — 'पूना हायस्कुलांत' शिक्षकाची नोकरी.

१८७४ — 'निबंधमाला' सुरू.

१८७८ — 'काव्येतिहास-संग्रह' मासिक चालू.

१८७८ — 'चित्रशाळे'ची स्थापना.

१८७९ — कृष्णशास्त्री चिपळूणकर ह्यांचें निधन ता. २० मे रोजीं.

१८७९ — विष्णुशास्त्र्यांनीं सरकारी नोकरीचा राजीनामा दिला.

१८७९ — 'किताबखाना' हें पुस्तकाचें दुकान उघडलें.

१८८० — 'न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना ता. १ जानेवारी रोजीं.

१८८१ — केसरी' व 'मराठा' हीं वृत्तपत्रें सुरू.

१८८२ — मृत्यु, ता. १७ मार्च रोजीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्राचे संजीवक

लेखक — दा. न. शिखरे, एम्. ए.

१ लोकमान्य टिळक
२ न्यायमूर्ति रानडे
३ सार्वजनिक काका
४ मालाकार चिपळूणकर
५ 'सुधारक' कर्ते आगरकर
६ साहित्यसम्राट् केळकर
७ महान् मुत्सद्दी ना. गोखले
८ काकासाहेब खाडिलकर
९ 'काळ' कर्ते परांजपे
१० स्वातंत्र्यवीर सावरकर
११ सेनापति बापट
१२ सन्त साने गुरुजी

मूल्य प्रत्येकीं आठ आणे

छत्रपति शिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्राला जें स्वातंत्र्याचें सिंहासन मिळवून दिलें तें इंग्रजी सत्तेनें ढासळून टाकलें. तें सिंहासन परत मिळविण्यासाठीं असंख्य नररत्नें झटलीं व झगडलीं हें आपलें केवढें भाग्य!

आतां आपल्याला नवा भारत, नवा महाराष्ट्र उभारावयाचा आहे. त्यासाठीं पुढील पिढ्यांपुढें नवीं ध्येयें, नवीं मूल्यें, नवीं श्रद्धास्थानें ठेवलीं पाहिजेत. ध्येयनिष्ठा, सेवावृत्ति व त्यागबुद्धि ह्या गुणांचें रक्त नव्या पिढीच्या नसांतून खेळेल तरच आपला भारत सर्वांगीण स्वतंत्रता उपभोगूं शकेल.

ह्या गुणांचें बीजारोपण करावयाचें म्हणजे त्या गुणांचे पुतळे असलेल्या पुरुषश्रेष्ठांचीं चरित्रें नव्या पिढीला सांगणें. महाराष्ट्राला संजीवन देणाऱ्या बारा विभूतींचीं चरित्रें श्री. शिखरे यांनीं मुद्दाम लिहिलीं आहेत. श्री. शिखरे यांनीं तीं कशीं लिहिलीं असतील हें लिहिणें नलगे.

केशव भिकाजी ढवळे, मुंबई ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar